RNI No. MAHBIL /2009/31748

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—अ-मध्य उप-विभाग

वर्ष १, अंक ५३(२)] शनिवार, ऑगस्ट १, २०१५/श्रावण १०, शके १९३७ [पृष्ठे १५, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ९०**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त)**

**आदेश व अधिसूचना.**

**नगरविकास विभाग**

४ था मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १ ऑगस्ट २०१५

**अधिसूचना**

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.**

क्रमांक एमयुएन. २०१४/प्र. क्र. ९३/नवि-१८.—ज्याअर्थी, शासनाने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) (यात यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे.) याच्या कलम ३४१ क चे पोट-कलम (१), (१क) आणि (२) यांच्या तरतुदीनुसार, शासन उद्घोषणा, नगरविकास विभाग क्र. एमसीओ. २०१३/प्र. क्र. ८४/भाग-१/नवि-१४, दिनांक १ मार्च २०१४ याद्वारे **महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र,** दिनांक १ मार्च २०१४ यामध्ये उद्घोषणा प्रसिद्ध केली असून, महाराष्ट्र शासनाने अकोला जिल्ह्यातील बार्शिटाकळी या ग्रामपंचायतीचे स्थानिक क्षेत्र, ग्रामीण क्षेत्रातून नागरी क्षेत्रामध्ये संक्रमित होणारे क्षेत्र आणि तालुका मुख्यालय असल्यामुळे हे संक्रमणात्मक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करण्यासाठी व उक्त संक्रमणात्मक क्षेत्रासाठी बार्शिटाकळी नगरपंचायत या नावाने नगरपंचायत गठीत करण्यासाठी, उक्त अधिनियमाचे कलम ३४१ क चे पोट-कलम (१), (१क) आणि (२) या अन्वये अधिसूचना काढण्याच्या आपल्या प्रस्तावावर आक्षेप मागविले आहेत ;

आणि ज्याअर्थी, अधिसूचनेत नमूद कालावधीत शासनाकडे प्राप्त आक्षेपांचा शासनाने विचार केला आहे ;

आणि ज्याअर्थी, भारताचे संविधानाच्या अनुछेद २४३-थ च्या खंड (२) मध्ये नमूद केलेल्या बाबी विचारात घेऊन महाराष्ट्र शासनाला, यासोबत जोडलेल्या अनुसूची "अ" मध्ये अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेले उक्त स्थानिक क्षेत्र हे, संक्रमणात्मक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करणे इष्ट वाटते.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम ३४१ क चे पोट-कलम (१), (१क) आणि (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून व त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे उक्त स्थानिक क्षेत्र हे संक्रमणात्मक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करीत असून, त्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ३४१ क चे पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, बार्शीटाकळी नगरपंचायत या नावाने एक नगरपंचायत गठीत करण्यात येत आहे. उक्त संक्रमणात्मक क्षेत्राच्या हद्दीत यासोबत जोडलेल्या अनुसूची "ब" मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील.

**अनुसूची "अ"**

**संक्रमणात्मक क्षेत्राच्या अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेले स्थानिक क्षेत्र.—**

बार्शिटाकळी ग्रामपंचायतीत असलेले संपूर्ण क्षेत्र.

**अनुसूची "ब"**

**संक्रमणात्मक क्षेत्रातील स्थानिक क्षेत्राच्या हद्दीचा तपशील.—**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा तीन) अन्वये स्थापन केलेल्या बार्शिटाकळी या ग्रामपंचायतीच्या क्षेत्राची हद्द.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्र. ता. गौड,**
शासनाचे सह सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 1st August 2015

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

No. MUN. 2014/C.R. 93/UD-18.—Whereas by the Government Proclamation, Urban Development Department No. MCO.2013/C.R. 84/Part-1/UD-14, dated the 1st March 2014, published in the *Maharashtra Government Gazette,* dated the 1st March 2014 issued in pursuance of the provisions of sub-section (*1B*) of section 341A of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965) (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra invited objections to its proposal to issue a notification under sub-sections (*1*), (*1A*) and (*2*) of section 341A of the said Act, to specify the local area of the Village Panchayat, Barshitakli in Akola District, being an area in transition from a rural area to an urban area and a Taluka Headquarter, to be a transitional area and to constitute a *Nagar Panchayat* by the name of Barshitakli *Nagar Panchayat* for the said transitional area ;

And whereas, the Government has considered the objections received pursuant to the said Proclamation within the period specified therein ;

And whereas, having regards to the factors mention in clause (2) of article 243-Q of the Constitution of India, the Government of Maharashtra considers it expedient to specify the said local area, more particularly described in Schedule "A" appended hereto, to be a transitional area ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (*1*), (*1A*) and (*2*) of section 341A of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby specifies the said local area to be a transitional area for which there shall be constituted a *Nagar Panchayat* as provided in sub-sections (*1*), (*1A*) and (*2*) of section 341A of the said Act, by the name of the *Barshitakli Nagar Panchayat*. The boundaries of the said transitional area shall be such as are specified in Schedule "B" appended hereto.

*Schedule "A"*

**Description of the Local Area to be specified as a transitional area—**

The whole area of the Village Panchayat of Barshitakli.

*Schedule "B"*

**Boundaries of the Local area to be specified as a transitional area—**

Boundaries of the area of the Village Panchayat of Barshitakli constituted under the Maharashtra Village Panchayats Act (III of 1959).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. T. GOUD,
Joint Secretary to Government.

**नगरविकास विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय

मुंबई ४०० ०३२, दिनांक १ ऑगस्ट २०१५

**अधिसूचना**

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.**

क्रमांक एमयूएन. २०१४/प्र. क्र. ९३/नवि-१८.—ज्याअर्थी, शासन अधिसूचना, नगरविकास विभाग क्रमांक एमयूएन. २०१४/प्र. क्र. ९३/ नवि-१८, दिनांक १ ऑगस्ट २०१५ अन्वये महाराष्ट्र शासनाने अकोला जिल्ह्यातील बार्शिटाकळी या तालुका मुख्यालय असलेल्या महसुली गावाचे क्षेत्र संक्रमण क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट केले आहे आणि या क्षेत्राकरिता बार्शिटाकळी नगरपंचायत गठित केली आहे ;

आणि ज्याअर्थी, नव्याने गठित बार्शिटाकळी नगरपंचायतीवर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या तरतुदीनुसार शासकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करणे इष्ट वाटते.

म्हणून, आता, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा.४०) याच्या कलम ३४० च्या पोट-कलम (२) मधील खंड (इ) व कलम ३४१ क द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे, नव्याने गठित केलेल्या उक्त नगरपंचायतीची उक्त अधिनिमयांन्वये यथोचित रचना होईपर्यंत तहसीलदार, बार्शिटाकळी, जिल्हा अकोला यांची बार्शिटाकळी नगरपंचायतीशी संबंधित सर्व अधिकार व कर्तव्य पार पाडण्यासाठी प्रशासक म्हणून नियुक्ती करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्र. ता. गौड,**

शासनाचे सहसचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 1st August 2015

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

No. MUN. 2014/ C.R. 93/UD-18.—Whereas, by the Government Notification, Urban Development Department, No. MUN. 2014/C.R. 93/UD-18, dated the 1st August 2015, the Government of Maharashtra has specified the area of Revenue Village Barshi Takli and a Taluka Head Quarter in Akola District as transitional area being an area in transition from rural to urban area and has constituted a Nagar Panchayat by the name of the Barshi Takli Nagar Panchayat for the said smaller urban area ;

And, whereas, it is expedient to appoint a Government Officer on newly constituted Barshi Takli Nagar Panchayat in accordance with the provisions of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965.

Now, therefore, in exercise of the powers conferred by section 341 C read with clause (*i*) of section 340 of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965) and all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby appoints the Tahsildar of Taluka Barshi Takli, District Akola as an Administrator of the said newly constituted Nagar Panchayat to exercise all powers and duties relating to the Barshi Takli, Nagar Panchayat till the said Nagar Panchayat is duly constituted in accordance with the provisions of the said Act.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. T. GOUD,
Joint Secretary to Government.

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१

दिनांक १ ऑगस्ट २०१५

## अधिसूचना

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१.**

क्रमांक झेडपीबी. २०१५/प्र.क्र. १४/बार्शिटाकळी (१)/पं.रा. ५.—महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. पाच) यांचे कलम ४ यासह २५४ चे पोट-कलम (१) चा खंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे या सोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (५) मध्ये नमूद विनिर्दिष्ट केलेल्या भूमापन क्रमांक समाविष्ट असलेली स्थानिक क्षेत्रे स्तंभ (६) मध्ये त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून अकोला जिल्ह्यातून वगळीत आहे :—

### अनुसूची

| अ.क्र. | जिल्हा | गट | निवडणूक विभाग | स्थानिक क्षेत्र | वगळण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | अकोला | बार्शिटाकळी | बार्शिटाकळी | मौजे बार्शिटाकळी ग्रामपंचायतीत असलेले संपूर्ण क्षेत्र | १ ऑगस्ट २०१५ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**गिरीश भालेराव,**

शासनाचे उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT AND WATER CONSERVATION DEPARTMENT

Bandhakam Bhavan, 25, Marzban Path
Fort, Mumbai 400 001, dated the 1st August 2015

*NOTIFICATION*

MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

No. ZPB. 2015/C. R. 14/Barshi Takli (1)/PR-5.—In exercise of the powers conferred by clause (*a*) of sub-section (*1*) of section 254 read with sub-section (*1*) of section 4 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby excludes from the Akola District, the local areas specified in column (5) of the Schedule appended hereto, with effect from the date mentioned in column (6) thereof.

*Schedule*

| Sr. No. | District | Block | Electoral Division | Local Areas | Date of Exclusion |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 1 | Akola | Barshi Takli | Barshi Takli | The whole area of the Village Panchayat of Barshi Takli. | 1st August 2015. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

GIRISH BHALERAO,
Deputy Secretary to Government.

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१

दिनांक १ ऑगस्ट २०१५

**आदेश**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१.**

क्रमांक झेडपीबी. २०१५/प्र. क्र. १४/बार्शि टाकळी (२)/पं.रा. ५.—महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. पाच) याच्या कलम ५ यासह २५६ चे पोट-कलम (१) चा खंड (ख) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, सोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (५) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या भूमापन क्रमांकाचा समावेश असलेले स्थानिक क्षेत्र, स्तंभ क्र. (६) मध्ये त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांक १ ऑगस्ट २०१५ पासून अकोला जिल्ह्याच्या बार्शि टाकळी गटातून वगळीत आहे आणि त्या प्रयोजनार्थ शासकीय अधिसूचना, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक पीएसई. १०९६/प्र.क्र. ११४/०५, दिनांक १९ सप्टेंबर १९९६ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त अधिसूचनेच्या अनुसूचीमध्ये, अकोला जिल्ह्याशी संबंधित नोंद २२ मध्ये बार्शि टाकळी तालुक्याशी संबंधित स्तंभ (३) मधील नोंदी समोर स्तंभ (४) मध्ये “ बार्शि टाकळी ” या शब्दाऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल,—

“ बार्शी टाकळी खालील स्थानिक क्षेत्र वगळून—

मौ. बार्शी टाकळी ग्रामपंचायतीत असलेले संपूर्ण क्षेत्र ”.

**अनुसूची**

| अ.क्र. | जिल्हा | गट | निर्वाचक गण | स्थानिक क्षेत्र/तालुका | वगळण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | अकोला | बार्शि टाकळी | बार्शि टाकळी १<br>बार्शि टाकळी २. | मौजे बार्शी टाकळी ग्रामपंचायतीत असलेले संपूर्ण क्षेत्र | १ ऑगस्ट २०१५ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**गिरीश भालेराव,**

शासनाचे उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT AND WATER CONSERVATION DEPARTMENT

Bandhakam Bhavan, 25, Marzban Path
Fort, Mumbai 400 001, dated the 1st August 2015

*NOTIFICATION*

MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

No. ZPB. 2015/CR-14/Barshi Takli (2)/PR-5.—In exercise of the powers conferred by clause (*b*) of sub-section (*1*) of section 256 read with section 5 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby, excludes from the Barshi Takli Block of Akola District, the local areas specified in column (5) of the Schedule appended hereto, with effect from the 1st day of August 2015 ; and for that purpose amends the Government Notification, Rural Development and Water Conservation Department, No. PSE. 1096/CR-114/05, dated the 19th September 1996 as follows, namely :—

In the Schedule appended to the said notification, in entry 22 relating to Akola District, against entry in column (3) relating to Barshi Takli Taluka, in column (4), for the words " Barshi Takli Block " the following shall be substituted, namely :—

" Barshi Takli Block excluding the following local areas :—

The whole area of the Village Panchayat of Barshi Takli ".

*Schedule*

| Sr. No. | District | Block | Electoral College | Local Areas | Date of Exclusion |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 1 | Akola | Barshi Takli | Barshi Takli 1<br>Barshi Takli 2 | The whole area of the Village Panchayat of Barshi Takli. | 1st August 2015. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

GIRISH BHALERAO,
Deputy Secretary to Government.

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१

दिनांक १ ऑगस्ट २०१५

## अधिसूचना

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम.**

क्रमांक झेडपीबी. २०१५/प्र. क्र. १४/बार्शि टाकळी (३)/पं. रा. ५.—महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा महा. तीन) याचे कलम ४ चे पोट-कलम (२) चा खंड (ख) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ चा खंड (ग) व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांनुसार व संविधानाच्या भाग-IX च्या उद्देशार्थ आणि स्थायी समिती जिल्हा परिषद, अकोला ; ग्रामपंचायत, बार्शि टाकळी आणि ग्रामसभा, बार्शि टाकळी यांच्याशी विचारविनिमय करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बार्शि टाकळी, बागायत बार्शी टाकळी, वानखेडपूर, सफेपूर, अश्करीपूर, बाखरापूर, अटकळी व खोरीकुदावंतपूर या महसुली गावाच्या समोरील स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेले स्थानिक क्षेत्र त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून गावाचा भाग म्हणून राहणार नाही असे जाहीर करीत आहे.

## अनुसूची

| अ.क्र. | गावे | स्थानिक क्षेत्रे | गाव म्हणून संपुष्टात आल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | बार्शि टाकळी | मौजे बार्शि टाकळी ग्रामपंचायतीत असलेले संपूर्ण क्षेत्र | १ ऑगस्ट २०१५ |
| २ | बागायत बार्शि टाकळी | | |
| ३ | वानखेडपूर | | |
| ४ | सफेपूर | | |
| ५ | अश्करीपूर | | |
| ६ | बाखरापूर | | |
| ७ | अटकळी | | |
| ८ | खोरीखुदावंतपूर. | | |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**गिरीश भालेराव,**

शासनाचे उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT AND WATER CONSERVATION DEPARTMENT

Bandhakam Bhavan, 25, Marzban Path
Fort, Mumbai 400 001, dated 1st August 2015

*NOTIFICATION*

MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT.

No. ZPB. 2015/CR-14/Barshi Takli (3)/PR-5.—In exercise of the powers conferred by clause (*b*) of sub-section (*2*) of section 4 of the Maharashtra Village Panchyats Act (III of 1959), read with clause (*g*) of article 243 of the Constitution of India, and of all other powers enabling it in that behalf, and in partial modification of all earlier notifications issued in this behalf, and after consultation with the Standing Committee of the Akola Zilla Parishad, Village Panchayat, Barshi Takli and Gram Sabha, Barshi Takli in Akola District, the Government of Maharashtra, hereby declares that the local areas specified in column (3) of the Schedule appended hereto, comprising the revenue villages Barshi Takli, Bagayat Barshi Takli, Wankhedpur, Safepur, Ashkaripur, Bakhrapur, Atkali and Khorikhudavantpur as specified in column (2) there of, shall cease to be the village, for the purposes of Part IX of the Constitution, with effect from the date shown in column (4) thereof :—

*Schedule*

| Serial No. (1) | Revenue Villages (2) | Local areas (3) | Date of Cessation (4) |
|---|---|---|---|
| 1 | Barshi Takli | The whole area of the Village Panchayat of Barshi Takli. | 1st August 2015 |
| 2 | Bagayat Barshi Takli | | |
| 3 | Wankhedpur | | |
| 4 | Safepur | | |
| 5 | Ashkaripur | | |
| 6 | Bakhrapur | | |
| 7 | Atkali | | |
| 8 | Khorikhudavantpur. | | |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

GIRISH BHALERAO,
Deputy Secretary to Government.

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१

दिनांक १ ऑगस्ट २०१५

**आदेश**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१.**

क्रमांक झेडपीबी २०१५/प्र.क्र. १४/बार्शि टाकळी (४)/पं.रा.५.— ज्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. अधि. ५) याच्या कलम ४ चे पोट-कलम (१) यासह कलम २५४ च्या पोट कलम (१) चा खंड (क) यान्वये महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक झेडपीबी. २०१५/प्र.क्र. १४/बार्शि टाकळी (१)/पं.रा.५, दिनांक १ ऑगस्ट २०१५, याद्वारे अकोला जिल्हा परिषदेच्या परिषद सदस्यांच्या पदावधीमध्ये, अकोला जिल्ह्याच्या सीमांमधून, इतर गोष्टींबरोबरच यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये नमूद केलेल्या निवडणूक विभागाचा समावेश असलेल्या स्थानिक क्षेत्रांना त्यामधून वगळून (यात यानंतर ज्याचा निर्देश " वगळलेले क्षेत्र " असा करण्यात आला आहे) त्या सीमांमध्ये फेरफार केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, हे वगळलेले क्षेत्र आता, बार्शि टाकळी नगर पंचायत क्षेत्रात समाविष्ट करण्यात आले असून त्या क्षेत्राचा भाग बनलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अनुसूचीच्या स्तंभ (५) मध्ये नमूद केलेला अकोला जिल्हा परिषदेचा परिषद सदस्य हा, उक्त जिल्हा परिषदेच्या, या अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये नमूद केलेल्या, वगळलेल्या क्षेत्राचे प्रतिनिधीत्व करतो, असे महाराष्ट्र शासनाचे मत आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) याच्या कलम २५५ च्या पोट-कलम (२) चा खंड (ख) चा उप-खंड (दोन) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या संदर्भात समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, तसेच अकोला जिल्हा परिषदेच्या संबंधित सदस्यास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, महाराष्ट्र शासन याद्वारे, उक्त अनुसूचीच्या स्तंभ (५) मध्ये नमूद केलेल्या, अकोला जिल्हा परिषदेच्या सदस्यास १ ऑगस्ट २०१५ या दिनांकापासून पदावरून दूर करीत आहे.

**अनुसूची**

| अ.क्र. | जिल्हा | गट | निवडणूक विभाग | जिल्हा परिषद सदस्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | अकोला | बार्शि टाकळी | बार्शि टाकळी | रेहानाबी आलमगीर खान |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**गिरीश भालेराव,**
शासनाचे उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT AND WATER CONSERVATION DEPARTMENT

Bandhakam Bhavan, 25, Marzban Path
Fort, Mumbai 400 001, dated the 1st August 2015

### *Order*

MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

No. ZPB. 2015/CR-14/Barshi Takli (4)/PR 5.— Whereas by Government Notification, Rural Development and Water Conservation Department No. ZPB. 2015/CR. 14/Barshi Takli (1)/PR-5, dated the 1st August 2015, issued under clause (*a*) of sub-section (*1*) of section 254 read with sub-section (*1*) of section 4 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962), the Government of Maharashtra during the term of the Councillor of the Akola Zilla Parishad altered the boundaries of the Akola District by excluding, *inter alia,* therefrom the local areas comprising the electoral Division mentioned in column (*4*) of the Schedule appended hereto (hereinafter referred to as " the excluded area ");

And whereas, the excluded area have now been included in, and forms part of, the Municipal area of the *Nagar Panchayat* of the Barsh Takli ;

And Whereas, the Government of Maharashtra is of the opinion that the Councillor of the Nagpur *Zilla Parishad* mentioned in column (*5*) of the said Schedule, represents the excluded area mentioned in column (4) of the said *Zilla Parishad.*

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-clause (*ii*) of clause (*b*) of sub-section (*2*) of section 255 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962), and after giving, to the concerned Councillor of Akola *Zilla Parishad*, the reasonable opportunity of being heard and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby removes with effect from the 1st day of August 2015 the Councillor of the Akola *Zilla Parishad* mentioned in clomumn (5) of the said Schedule :—

*Schedule*

| Sr. No. | District | Block | Electoral Division | Name of the Zilla Parishad Councillor |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1 | Akola | Barshi Takli | Barshi Takli | Rehanabi Alamgir Khan |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

GIRISH BHALERAO,
Deputy Secretary to Government.

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१
दिनांक १ ऑगस्ट २०१५

**आदेश**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१.**

क्रमांक झेडपीबी. २०१५/प्र.क्र.१४/ बार्शि टाकळी (५)/पं.रा. ५.— ज्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. अधि. ५) याचे कलम ५ सह, कलम २५६ च्या पोट-कलम (१) चा खंड (ख) यान्वये महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, क्रमांक झेडपीबी. २०१५/ प्र.क्र.१४/ बार्शि टाकळी (२)/पं.रा.५, दिनांक १ ऑगस्ट २०१५ याद्वारे अकोला जिल्हा परिषदेच्या बार्शि टाकळी पंचायत समितीच्या सदस्यांच्या पदावधीमध्ये, बार्शि टाकळी गटाच्या सीमांमधून, इतर गोष्टींबरोबरच, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (५) मध्ये नमूद केलेल्या निर्वाचक गणाचा (इलेक्ट्रोल कॉलेजचा) समावेश असलेल्या स्थानिक क्षेत्रांना त्यामधून वगळून (यात यानंतर ज्याचा निर्देश " वगळलेले क्षेत्र " असा करण्यात आला आहे.) त्या सीमांमध्ये फेरफार केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, हे वगळलेले क्षेत्र आता बार्शि टाकळी नगर पंचायत क्षेत्रात समाविष्ट करण्यात आले असून त्या क्षेत्राचा भाग बनलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अनुसूचीच्या स्तंभ (६) मध्ये नमूद केलेले बार्शि टाकळी या पंचायत समितीचे सदस्य या, उक्त पंचायत समितीच्या, या अनुसूचीच्या स्तंभ (५) मध्ये नमूद केलेल्या, वगळलेल्या क्षेत्राचे प्रतिनिधीत्व करतात, असे महाराष्ट्र शासनाचे मत आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) याच्या कलम २५७ च्या पोट-कलम (दोन) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या संदर्भात समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, तसेच बार्शि टाकळी पंचायत समितीच्या संबंधित सदस्यांस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, महाराष्ट्र शासन याद्वारे, उक्त अनुसूचीच्या स्तंभ (६) मध्ये नमूद केलेल्या, बार्शि टाकळी पंचायत समितीच्या सदस्यांस १ ऑगस्ट २०१५ या दिनांकापासून पदावरून दूर करीत आहे

**अनुसूची**

| अ.क्र. | जिल्हा | गट | निवडणूक विभाग | निर्वाचक गण | पंचायत समिती सदस्यांचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | अकोला | बार्शि टाकळी | बार्शि टाकळी | बार्शि टाकळी १<br>बार्शि टाकळी २ | सै. फारुक सै. मुस्ताक<br>संजय आत्माराम मुळे. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**गिरीश भालेराव,**
शासनाचे उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT AND WATER CONSERVATION DEPARTMENT

Bandhakam Bhavan, 25, Marzban Path
Fort, Mumbai 400 001, dated the 1st August 2015

### *Order*

MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

No. ZPB. 2015/CR.14/ Barshi Takli (5)/PR-5.—Whereas by Government Notification, Rural Development and Water Conservation Department No. ZPB 2015/ CR.14/Barshi Takli (2)/PR 5 dated the 1st August 2015, issued under clause (*b*) of sub-section (*1*) of section 256 read with section 5 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah.V of 1962), the Government of Maharashtra during the term of Office of the member of the Barshi Takli *Panchayat Samiti* of the Akola Zilla Parishad, altered the boundaries of the Barshi Takli Block by excluding, *inter alia,* therefrom the local areas comprising the electoral college mentioned in column (5) of the Schedule appended hereto (hereinafter referred to as " the excluded area ") ;

And whereas, the excluded area has now been included in and forms part of the Municipal area of the Barshi Takli *Nagar Panchayat* ;

And whereas, the Governemnt of Maharashtra is of the opinion that the member of the Barshi Takli *Panchayat Samiti* mentioned in column (6) of the said Schedule, represents the excluded area mentioned in column (5) of the said *Panchayat Samiti.*

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*ii*) of section 257 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962), and after giving, to the concerned members of Barshi Takli *Panchayat Samiti* , the reasonable opportunity of being heard and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby removes, with effect from the 1st day of August 2015, the members of the Barshi Takli *Panchayat Samiti* mentioned in column (6) of the said Schedule.

*Schedule*

| Sr. No. | District | Block | Electoral Division | Electroral Colleges | Name of the Panchayat Samiti Members |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 1 | Akola | Barshi Takli | Barshi Takli | Barshi Takli 1<br>Barshi Takli 2 | Sai. Faruk Sai. Mustak<br>Sanjay Atmaram Mule |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

GIRISH BHALERAO,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.